## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सायकांळ)

जा.क्र. ७८९/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०१/१२/२०१६

**१)शेतशिवारातुन विद्युत ट्रान्सफार्मधील आईलची चोरी. :–**

दिनांक २९+३०/१०/२०१६ चे रात्र. दर. यातील कोणीतरी अज्ञात चोराने सुना मौका पाहुण सालेबर्डी शेत शिवारातील ६३ केव्ही या विद्युत ट्रान्सफार्मर मधुन ट्रान्सफार्मरचे खालील टॅपचे नट खोलुन त्या मधुन १५० लिटर आईल कि. २०,०००/–रु. चे चोरुन नेल्याने फिर्यादी अजय उत्तमराव गेडाम वय २९ वर्ष, रा. विज वितरण कंपनी सेंदुरवाफा यांचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम १३६भा.वि.का. २०१२. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. तलमले मेश्राम पो.स्टे. दिघोरी हे करीत आहेत.

**२) अंधारात दखलपात्र संशयितरित्या गुन्हा करण्याच्या उद्देशाने मिळुन आल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक ३०/११/२०१६ चे ०२.०० वा. दर. यातील आरोपी हे सुर्यास्त ते सुर्यादया पुर्वी स्वत:चे अस्तित्व लपवुन अंधारात संशयितरित्या दखलपात्र गुन्हा करण्याच्या बेतात वावरतांनी मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोउपनि कारंडे पो. स्टे. वरठी यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन वरठी येथे कलम १२२(ब) मपोका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. कारंडे पो.स्टे. वरठी हे करीत आहेत.

**३) विषारी औषधप्राशन करुन मुलीचा उपचारा दरम्यान मृत्यु . :–**

दिंनाक. २८/११/२०१६ रोजी ०९.०० वा. दर. यातील मृतक कु. स्मिता उदाराम वंजारी वय १८ वर्ष, रा. सोमनाडा हीने विषारी औषध प्राशन केल्याने तिला उपचारा करीता सा. रु. भंडारा येथे वडीलांनी भरती केले असता उपचारा दरम्यान दि. २८/११/२०१६ चे १०.०० वा. मरण पावल्याने डॉ. ममो वरुन पोस्टे भंडारा येथे मर्ग क्र. ००/१६ क. १७४ जाफौ चे कागदपत्र पोस्टेला प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. भोगाडे पो. स्टे. अडयाळ यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. जाधव पो. स्टे. अडयाळ हे करीत आहेत.

**४) विहरीचे पाण्यात बुडुन मनोरुग्ण इसमाचा मृत्यु . :–**

दिंनाक.२८/११/२०१६ रोजी ०५.०० ते ३०/११/२०१६ चे ०६.०० वा. दर. यातील मृतक विनोद रामरतन सोनवाने वय २५ वर्ष, रा. चुन्हाड हा मनोरुग्ण असुन सन २०१३ पासुन त्याचे औषधोउपचार सुरु होते. परंतु प्रकृती मध्ये सुधारना न झाल्याने तो वेडेपणाचे भरात रात्री बेरात्री घरातुन निघुन जात असुन दिनांक २८/११/२०१६ चे ०५.०० वा. दर. मृतक हा घरुन निघुन गेला त्याची प्रेत चुन्हाड येथे शिव मंदीराचे बाजुला असलेल्या विहीरीत दि. ३०/११/२०१६ चे ०६.०० वा. दरम्यान मिळुन आल्याने मृतकने वेळेपणाचे भरात विहरीचे पाण्यात उडी घेवुन आत्महत्या केल्याने फिर्यादी रामरतन काशीराम सोनवाने वय ५० वर्ष, रा. चुन्हाड यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मुंडले पो. स्टे. सिहोरा हे करीत आहेत.

५) इसमाचा औषधोपचारा दरम्यान मृत्यु. . :–

दिंनाक.२९/११/२०१६ रोजी २३.४५ वा. दर. यातील मृतक मार्कंड तुकाराम चांदेवार वय ५० वर्ष, रा. गोंडउमरी याची अचानक प्रकृती बिघडल्याने त्याला औषधोपचारा करीता नातेवाईकांनी उपजिल्हा रुग्नालय साकोली येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉ. मेमो व फिर्यादी राजु मोहन चांदेवार वय २२ वर्ष, रा. गोंडउमरी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. वानखेडे पो. स्टे. साकोली हे करीत आहेत.

६) विषारी औषध प्राशन केल्याने उपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु . :–

दिंनाक.२९/११/२०१६ रोजी ०९.०० वा. दर. यातील मृतक देवेन्द्र लक्ष्मण हेवसे वय ३६ वर्ष, रा. खराडी याने विषारी औषध प्राशन केल्याने त्यास उपचारा करीता सा. रु. भंडारा येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉ. मेमो वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे मर्ग क्र. ००/१६ कलम १७४ जाफौचे कागदपत्र पोस्टे जवाहरनगर येथे प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. सार्वे याचे बयाना वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. कांबळे पो. स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.